# जाहीर सुचना

विषय :- अनधिकृत फेरीवाल्यांवर निष्कासनाची कारवाई करण्याकरीता कंत्राटी कामगार अशासकीय संस्था (एन.जी.ओ) मार्फत पुरवठा करण्याबाबतची जाहिर सुचना.

सदर जाहिर सुचनेमार्फत सर्व अशासकीय संस्थांना कळविण्यात येते की, एफ/दक्षिण विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात असणा-या इच्छुक धर्मदाय आयुक्त व बृहन्मुंबई महानगरपालिकेत नोंदणीकृत असलेल्या स्थानिक अशासकीय संस्था, मंजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकरी संस्था, औदयोगिक सेवा सहकारी संस्था या संस्थाकडून माहे जानेवारी ते फेब्रुवारी 2024 या कालावधीकरीता अतिक्रमण निर्मुलन वाहनांवर एकुण 04 कंत्राटी कामगार पुरविण्याकरीता मौहरबंद इच्छापत्र मागविण्यात येत आहेत.

सदर इच्छापत्राचा नमुना वरिष्ठ निरीक्षक अनुज्ञापन (अतिक्रमण निर्मुलन), बृहन्मुंबई महानगरपालिका एफ/दक्षिण विभाग कार्यालय, पहिला मजला, खोली क्र.1, डॉ.आंबेडकर मार्ग, परळ, मुंबई–400 012. येथे रुपये 300 /- अधिक 18 % वस्तु व सेवा कर असे एकूण रुपये 354 /- आकारुन (ना - परतावा) रोख स्वरुपात चलन काढून दि. 21.12.2023 ते दि. 29.12.2023 या दिवशी सकाळी 10.30 ते दुपारी 01.00 वाजेपर्यंत विकत घेऊ शकतात तसेच आवश्यक कागदपत्रांसहित सिलबंद अर्ज दि. 29.12.2023 पर्यंत दुपारी 01.00 वाजेपर्यंत अनुज्ञापन खाते, एफ/दक्षिण विभाग, पहिला मजला येथे सिलबंद पेटीत टाकावे. नमुद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

लॉटरीची तारीख दि. 01.01.2024 रोजी दुपारी 03.00 वाजता निश्चित करण्यात आलेली आहे.

18.12.23

सहाय्यक आयुक्त, एफ/दक्षिण विभाग

18/12